Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# दलित धर्मांतरीत बौध्दांच्या धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक स्थितीचा आढावा : एक विष्लेषणात्मक अध्ययन

**श्री. संजय चंद्रभान मेश्राम**
संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग,
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय,
देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली

**प्रा. डॉ. विठ्ठल चव्हाण**
मार्गदर्शक
समाजशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय,
देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली

---

***सारांश :***

*पूर्व विदर्भातील नागपूर व भंडारा जिल्ह्यातील दलित धर्मांतरीत बौध्दांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा आढावा या षिर्षकाअंतर्गत संषोधन कार्य करतांना धर्मांतरीत बौध्दांच्या धार्मिक, सांस्कृतिक व षैक्षणिक स्थितीचा आढावा : एक विष्लेषणात्मक अध्ययन या विषयावर लघुसंषोधन कार्य करतांना प्रस्तुत अध्ययन विषयामध्ये बौध्द धर्माचा ऐतिहासिक आढावा घेण्यात आला. सोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बौध्द धर्माबाबतचे विचार प्रस्तुत करण्यात आलेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धर्म का? स्विकारला यावर विस्तृत विवेचन करण्यात आलेले आहे. तसेच बौध्द धर्माचा स्विकार केल्यानंतर समाजातील लोकांमध्ये आणि धर्मातरण केलेल्या लोकांमध्ये झालेले परिवर्तन यावर प्रकाष टाकण्याचा प्रयत्न केला आहे.*

*दलितांप्रती हिंदु धर्मीयांमध्ये सहानुभूतीची भावना निर्माण होत नाही व हिंदु धर्मीयांचे कदापिही मतपरिवर्तन होणार नाही हे ओळखुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतरणाची घोषणा करून, ही घोषणा प्रत्यक्षात 14 ऑक्टोंबर 1956 ला दीक्षा भूमिवर लाखो बांधवासह बौध्द धर्माचा स्विकारकरून पूर्ण केली. हयानंतर दलित धर्मांतरीत बौध्दांमध्ये विविध क्षेत्रात परिवर्तन घडून आले आहे. प्रस्तुत लघुसंषोधनात दलित धर्मांतरीत बौध्दांच्या धार्मिक, सांस्कृतिक व षैक्षणिक स्थितीचा आढावा या : एक विष्लेषणात्मक अध्ययन या विषयावर प्रकाष टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.*

**कळीचे शब्द :** स्पृश्य, अस्पृश्य, सवर्ण, अवर्ण, अपवित्र, निच, वंचित, अनिष्ठ, प्रथा, परंपरा, कर्मकांड,पवित्र, अपवित्र, गुलामगिरी, भ्रामक, सत्याग्रह, धर्मांतर, दर्षनी, अंधश्रध्दा, गुलाम, बंदी, षोषण, संघटीत शृखंला, क्रांती.

---

**प्रस्तावना :**

हिंदू धर्म जगाच्या इतिहासातील एकमेव धर्म असेल की, जो आपल्याच धर्मातील एका वर्गाला स्पृश्य व दुस—या वर्गाला अस्पृश्य, सवर्ण व अवर्ण या दोन वर्गात विभाजित करतो. हिंदू धर्मात स्पृश्य हिंदू अस्पृश्य हिंदूना अपवित्र व निच मानतो हया धर्मात अस्पृश्यावर अनेक बंधने लादण्यात आली होती. त्यांना सर्व प्रकारच्या मानवी अधिकारांपासून वंचित

ठेवण्यात आले होते. अषा वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था व कर्मकांडाचा पगडा असलेल्या हिंदू धर्मातीलएका दलित कुटुंबात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाल्यामुळे त्यांनाही स्पृश्य हिंदू कडून अपमान सहन करावा लागला. नीच दर्जाची वागणूक दिल्या गेली. हिंदू लोकांना जर प्राणाहून काही प्रिय असेल तर तो धर्म आहे. हया हिंदु धर्मातील अनिष्ठ प्रथा, परंपरा, कर्मकांड संपुष्ठात आणुन सर्वांना मानवतावादी जीवन जगता येईल हयाकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु धर्मात सुधारणा घडवून आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु हिंदु धर्मीयांचे हया दृष्टीने मन वळविणे षक्य नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कळून चुकले. ज्या धर्मात माणसाला माणूस म्हणून स्थान नाही. पषु–पक्षी पेक्षाही हीन दर्जाची वागणुक दिल्या जाते. तो धर्म काय कामाचा अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पक्की समजूत झाली व त्यांनी 13 ऑक्टोंबर 1935 रोजी नाशिक जवळील येवला येते धर्मांतराची घोषणा केली व ही घोषणा 14 ऑक्टोबर 1956 ला नागपूर येथील दीक्षाभूमी येथे बौद्ध धर्माचा स्वीकार करून पूर्ण केली

**धर्मांतरणाची पार्श्वभूमी :**

हिंदू धर्मातील विषमता युक्त सामाजिक व्यवस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म 14 एप्रिल 1891 ला मध्यप्रदेशातील महू या गावी एका दलित कुटुंबात झाला. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सुद्धा ह्या विषमता युक्त सामाजिक व्यवस्थेचा सामना करावा लागला. शिक्षण घेण्यावर त्यांना प्रतिबंध घालण्यात आला होता. तरीही ह्या विषमतायुक्त परिस्थितीचा सामना करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले शिक्षण जिद्दीने सुरू ठेवले व पुढे 1907 मध्ये मुंबईतील एल्फिन्स्टन स्कूल मधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. 1912 मध्ये मुंबई विद्यापीठातून पदवीची परीक्षा उत्तीर्ण केली. 1915 मध्ये पदवीत्तर पदवी ची परीक्षा उत्तीर्ण केली. 1916 मध्ये अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून पी.एच.डी. पदवी प्राप्त केली. 1921 मध्ये लंडन विद्यापीठाने अर्थशास्त्रातील एम.एस.सी. पदवी प्रदान केली. 1922 मध्ये बॅरिस्टरअॅट–लॉ ही कायद्याची उच्चतम पदवी प्रदान केली. 1923 मध्ये लंडन विद्यापीठांनी डी. एस. सी. ची पदवी प्राप्त केली. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थशास्त्र इतिहास समाजशास्त्र राज्यशास्त्र तत्त्वज्ञान कायदा इत्यादी विषयात जागतिक विद्वान म्हणून ओळखले जाऊ लागले डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विद्वत्तेमुळे त्यांना मोठी सरकारी नोकरी मिळवता आली असती अथवा वकिली करून भरपूर पैसा कमविता आला असता परंतु त्यांनी असे न करता जातीव्यवस्थेच्या अन्यायाखाली भरडल्या जाणा–या दलितांच्या उद्धाराचे पवित्र कार्य हाती घेतले. अस्पृश्य समाजाची गुलामगिरी नष्ट करण्याचा त्यांनी विडा उचलला. आपल्या पूर्व जन्माची फळे आपण भोगली पाहिजेत. अशी भ्रामक कल्पना अस्पृश्यांमध्ये हिंदू कडून बिंबविण्यात येऊन, सवर्ण समाज दलितांना पिळत होता दलितांची ही पिळवणूक संपविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आंदोलन सुरू केले छत्रपती शाहू महाराजांच्या मदतीने इसवी सन 1920 मध्ये मूकनायक पाक्षिक काढले. बहिष्कृत भारत साप्ताहिक काढले. बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना करून सामाजिक, शैक्षणिक व राजकीय हक्कांचा प्रयत्न केला दलितांना माणुसकीच्या हक्कासाठी जागे केले समता व प्रबुद्ध भारत वृत्तपत्रे काढली.जाती व्यवस्थेविरुद्ध लढा दिला. वर्णाश्रम चौकट संपवून समता प्रस्थापित

करण्यासाठी जाती–जातीमधील मिश्र विवाहाला प्रभावी साधन मानले. मनुस्मृतीमुळे हिंदू धर्मात वर्णाश्रम, विषमता व अन्याय जोपासला गेला म्हणून महाडच्या सत्याग्रह परिषदेत मनुस्मृतीचे दहन केले. 20 मार्च 1927 चा चवदार तळयाचा सत्याग्रह केला. 1930 मध्ये नाशिक येथील काळाराम मंदिरातील अस्पृश्यप्रवेशाबद्दलचा सत्याग्रह केला. ह्या सत्याग्रहाची सांगता करताना, हिंदू धर्मात अस्पृष्यांना न्याय मिळत नाही. व हया दृष्टीने हिंदु धर्मियांचे मन वळविणे षक्य नाही हा विचार त्यांच्या मनात पक्का रूजत गेला व हयातुनच 1935 मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी येवला परिषदेत धर्मांतर करण्याचे जाहीर केले.मी हिंदू म्हणून जन्मलो, ते माझ्या हातात नव्हते पण हिंदू म्हणून मी मरणार नाही असा पणच हया प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. 1936 मध्ये मुंबई येथे झालेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, माणूस धर्माकरिता नाही, धर्म माणसांकरिता आहे. माणुसकी प्राप्त करण्यासाठी धर्मांतर करा. जो धर्म माणुसकीला किंमत देत नाही, देवळात जाऊ देत नाही, पाणी पिऊ देत नाही, शिक्षण घेऊ देत नाही, नोकरीच्या आड येतो अशा धर्मात तुम्ही का? राहता असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपदेष केला अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची याद्वारे धर्मांतरणाची वाटचाल सुरू झाली.

**बौध्द धर्माचा स्विकार :**

हिंदू धर्मात सुधारणा घडवून आणून अस्पृश्यांना न्याय देण्याचे सर्व प्रयत्न अपयशी झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करून ह्या दिशेने वाटचाल सुरु केली. मात्र कोणत्या धर्माचा स्वीकार करायचा हा प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसमोर होता ह्यासाठी त्यांनी जगभरातील सर्वच धर्माचा अतिशय सूक्ष्म पद्धतीने अभ्यास केला हा अभ्यास करताना नास्तिक आणि आस्तिक अशा दोन्ही दर्शनी पद्धतीचा अवलंब केला. इस्लाम, खिस्ती व शीख धर्माकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सुरुवातीला ओढा होता परंतु शिखांमध्ये असलेली जाती व्यवस्था व कट्टरता कालांतराने त्यांना दूर नेत गेली. इस्लाम धर्मातील दार उल हरब सारख्या संकल्पना त्यांच्यातील संविधान वादी माणसाला पटण्यासारख्या नव्हत्या. शिवाय मुसलमान व खिस्ती धर्मामध्ये झालेला जातीचा शिरकाव त्यांना कसा काय मान्य झाला असता. ज्या गोष्टीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर धर्मांतर करू पाहु होत होते. त्यामुळेच हे तिन्ही धर्म डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारणे मान्य केले नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1907 मध्ये मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण केली होती. त्यावेळी ह्या निमित्ताने आयोजित सत्कार समारंभ सभेत दादासाहेब केळुसकर गुरुजींनी त्यांना 'बुद्ध चरित्र' भेट म्हणून दिले होते तिथूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कल हळूहळू बौध्द धर्माकडे वळत गेला. बौद्ध धर्म हा समता स्वातंत्र्य, बंधुता व विज्ञानवादी तत्त्वावर आधारलेला असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करण्याचे ठरविले. ह्या संबंधाने आपल्या भूमिकेचे समर्थन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात धर्म म्हणजे कोणतेही कर्मकांड अपेक्षित नसून, तो मला जीवन जगण्याची एक आदर्श पद्धती म्हणून अपेक्षित आहे, ती अशी एक आदर्श पद्धती असेल ज्यात वैज्ञानिक विचारांनाच मुख्य आधार

असेल, तर्काने गोष्टी आणि प्रष्न सोडविले जातील आणि त्यातून मिळणारी आशा मनुष्याला भविष्यासाठी प्रेरित करीत राहील, बुद्ध याच मातीतला आहे. आम्ही त्याचे पुनरुज्जीवन करीत आहोत कोणत्याही प्रकारच्या भेदांना थारा नसणा—या एका महान अशा परंपरेत आणि आदर्श पद्धतीमध्ये आम्ही प्रवेश करीत आहोत त्यानंतर आमचे जातीचे अस्तित्वच नष्ट झालेले असेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठरविल्याप्रमाणे 14 ऑक्टोबर 1956 ला नागपूर येथील दीक्षाभूमी येथे हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्माचा लाखो अनुयायासह स्वीकार केला. यामध्ये दलितांची संख्या लक्षणीय होती. या पाठोपाठ अनेक धर्मांतर सोहळे आयोजित करण्यात येऊन, लाखोच्या संख्येने दलित बौद्ध धर्माचा स्वीकार करीत आहेत. बौध्द धर्माच्या स्विकारानंतर दलित धर्मांतरित बौद्धांची धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक स्थिती काय आहे हयाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते.

**धार्मिक प्रभाव :**

हिंदू धर्म हा अंधश्रद्धा, कर्मकांड, अनिष्ट चालीरीती व रूढी परंपराचे गाठोडेच आहे. व्रत वैकल्य, उपपास,नवस केल्याशिवाय माणसाचे दु:ख नष्ट होत नाही. या काल्पनिक व भ्रामक कल्पनांनी कित्येक लोकांचे जीवन दु:खमय व कष्टमय झाले होते. हिंदू धर्मात तर अस्पृश्यांना पशुतुल्य समजले आहे. हिंदू धर्मात धार्मिक असमानता आहे. हिंदू धर्माच्या आज्ञा निषेधाचे उल्लंघन केल्यास अस्पृश्यांनी धर्म बुडविला म्हणून मारहाण व दंड करण्यात येई. परंतु बौद्ध धम्म स्वीकारल्यानंतर धर्मांतरीतबौध्दांनी अज्ञानाचे, धर्माचे, कर्मकांडाचे, गाठोडे फेकून दिले व त्यांच्यात वैचारिक परिवर्तन घडवून आले. जुन्या धार्मिक गोष्टी नष्ट केल्या. नवीन विचार व नवीन मूल्ये त्यांनी स्वीकारली धम्मदीक्षा प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या 22 प्रतिज्ञा दिल्या होत्या त्याप्रमाणे अस्पृश्यांनी आपल्या घरातील देवदेवतांचे फोटो व मुर्त्या फेकून दिल्या व त्यांचे अस्तित्वच त्यांनी नाकारले व त्यांनी बौद्ध धम्माप्रमाणे आचरण सुरू केले.

**सांस्कृतिक प्रभाव :**

हिंदू संस्कृती ही गुलामीची संस्कृती आहे आणि ही संस्कृती इथल्या ब्राह्मणांनी आपले वर्चस्व कायम ठेवण्यासाठी व इथल्या शूद्र व अतिशूद्र बहुजन समाजाला मानसिक गुलाम व बंदी बनवून ठेवण्यासाठी मुद्दामच लादल्या गेली.वास्तविक ही संस्कृती नसून एक प्रकारची विकृतीच आहे ही संस्कृती माणसा माणसांमध्ये भेद निर्माण करणारी होती. बहुजन समाजाचे शोषण करणारी ही एक व्यवस्था आहे या संस्कृतीने माणसाच्या शरीरालाच नव्हे तर माणसाच्या मेंदूला सुद्धा गुलाम केले होते. परंतु धर्मांतरानंतर दलितांनी ही प्रस्थापित व माणसाला गुलाम बनविणारी संस्कृती नाकारली. जोहार मायबाप म्हणणारा अस्पृश्य आता जय भीम व नमो—बुद्धाय म्हणायला लागला. उष्टया पत्राळीवरचे उष्टे जेवण खाण्याचे त्यांनी नाकारले मेलेली गुरे ओढण्यास नकार दिला, हिंदू धर्माचे उत्सव व सण करण्याचे सोडून दिले. जुन्या पद्धतीने रहाणे सोडले व दलितांच्या राहणीमानात बरेच परिवर्तन झाले. लग्न व समारंभआता 'आम्हाला कुणी अस्पृश्य व दलित म्हणून ओळखणार नाही मानवतावादी धम्माच्या स्वीकारानंतर आम्हाला नवीन ओळख व प्रतिष्ठा प्राप्त झाली. धर्मांतर एका अर्थाने

आमच्या मानवमुक्तीच्या जाहीरनामाच ठरला. धर्मांतराने आम्हाला लागलेली अस्पृश्यतेची घाण दूर केली. आम्ही सांस्कृतिक दृष्ट्या विकसितझालो. आम्ही ज्या संस्कृतीचा स्वीकार केला, त्या बौद्ध संस्कृतीला जगातल्या विकसित देशांनी स्वीकार केलेला आहे आमच्या जीवनमानाच्या कक्षाही रुंदवल्या गेल्या आहेत.

**शैक्षणिक प्रभाव :**

ज्या हिंदू धर्माने आम्हाला पिढ्यानंपिडया शिक्षण घेऊ दिले नाही.आम्हाला शिक्षणाचे अधिकारच नाकारले, त्यामुळेच इथल्या ब्राह्मणी व्यवस्थेने आम्हाला गुलाम करून ठेवले होते. आमचे वैचारिक स्वातंत्र्यच हिरावून घेतले होते. इंग्रज जर या देशात आले नसते तर आम्हाला शिक्षणच घेता आले नसते. शिक्षणाचे महत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले होते. त्यामुळेच ते शिक्षणाचे पंडित होऊ शकले शिक्षणामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगाचा इतिहास व धर्मांचा अभ्यास केला व शेवटी मानवतावादी व विज्ञानवादी बुद्ध धम्माचा आपल्या लाखो दलित बांधवांसोबत स्वीकार केला. धर्मांतर केल्यानंतर आमच्यामध्ये मोठ्या प्रमाणात वैचारिक परिवर्तन झाले. आता आम्हाला शिक्षणाचे महत्त्व कळले होते. बाबासाहेबांच्या शिका संघटित व्हा व संघर्ष करा या मूलमंत्रानी संबंध दलित समाज गतिमान झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने लोक शिक्षण घेऊ लागले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षातूनच त्यांना भारतीय राज्यघटनेमध्ये शिक्षणाचा मूलभूत अधिकार समाविष्ट करता आला. शिक्षणामुळेच आज दलितांमधील मोठ्या संख्येने इंजिनीयर, डॉक्टर, वकील कला व संस्कृतिक क्षेत्रात दिसू लागले आहेत व मोठमोठ्या पदावर जाऊन पोहोचले आहेत. हिंदू धर्मातीलच लोकं असे म्हणताना दिसतात की, ज्या दलितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व तथागताचा धम्म स्वीकारलात्यांनी स्वतःचा विकास करून घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः म्हटले होते, की शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो ते प्राशन करेल, तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. शिक्षण घेतल्यानेच दलितांना आपला हक्क व अधिकाराची जाणीव झाली. व ते आज आपल्या हक्कासाठी संघर्ष करताना दिसत आहेत

**निष्कर्ष :**

हिंदू धर्मात दलितांना सहानुभूती समता आणि स्वातंर्त्य कधीही मिळणार नाही व ह्या दिशेने हिंदू धर्मियांचे मतपरिवर्तन होणार नाही हे ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथील दीक्षाभूमी येथे 14 ऑक्टोबर 1956 रोजी दलित बांधवांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन ऐतिहासिक धर्मांतर घडवून आणले. शेकडो वर्षापासून पारंपारिक गुलामगिरीच्या शृंखला तोडून पिचलेल्या समाजाला शिरपेच्यात सन्मान खोवण्याची किमया डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नागपूर येथील धर्मांतराने केली. नागपुरातील दिक्षेने फक्त धर्मांतर केले नाही तर जगात सर्वात मोठी वैचारिक क्रांती घडवली दलितांनी परंपरेने वाट्याला आलेला जातीभेद आणि त्यामुळे शारीरिक तसेच मानसिक गुलामगिरीचे जगणे झिटकारून दिले व तथागत बुद्धांच्या स्वातंत्र्य, समता बंधुता व विज्ञानवादी तत्वांच्या आचरणामुळे आधी अस्पृशतेचे जीवन जगणा–या या दलित बांधवांच्या जीवनात क्रांतिकारी परिवर्तनाला सुरुवात

झाली. हे जरी खरे असले तरी दलितांच्या बाबतीत उच्चवर्णीयांचे पूर्णतः मत परिवर्तन झालेले नाही. आजही हा वर्ग दलितांकडे तिरस्कारयुक्त व हीन भावनेने बघतो आहे ही शोकांतिका आहे हया करिता धर्मनिरपेक्ष व जातीविरहित शिक्षणाला चालना देऊन ह्याचे धडे सर्व भारतीयांमध्ये गिरवीने ही काळाची गरज आहे.

**संदर्भ सूची :**


- डॉ. ग. ग. जाधव : दलित चळवळ : एक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक विष्लेषण, सुगावा प्रकाषन–1991
- कोसारे एच.एल.: विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास, ज्ञान–प्रदिन प्रकाषन नवी षुक्रवारी, नागपूर, 1984
- कांबळे उत्तमः जागतिकीकरण आणि दलितांचे प्रष्न, सुगावा प्रकाषन पुणे, 2002
- आंबेडकर बी. आर. हु अेअर दि षुद्राज, विष्णुस्मुती (अध्याय 27 सुत्रे–6–3), रघुवंषी प्रकाषन, पुणे– 1991
- डॉ. आर. एस. माने : धर्मांतर आणि सामाजिक परिवर्तन, लोकवाड.मय गृह प्रकाषन–1989
- भोळे भा. ल. विसावे षतक आणि भारतातील समता विचार, सुगावा प्रकाषन, पुणे –1991
- डॉ. एन. डी. कांबळे : बौध्द धर्म आणि दलित समाज, पॉप्युलर प्रकाषन–1995